**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.७८/२०२४ मधील नि.११ खालील आदेश**
**(पुनम ढवण/अभिजीत ढवण वगैरे)**
**CNR MHSN03-001692-2024**

अर्जदारने सदरचा अर्ज म.सं.कौ.हिं. कायद्याच्या कलम २३ नुसार अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाव्दारे अर्जदारने मुळ अर्ज निर्णीत होईपर्यंत उदरनिर्वाह व इतर खर्चाकरीता प्रतिमहिना र.रु.२०,०००/- पोटगी, संरक्षणात्मक आदेश, स्त्रिधन व लग्नात दिलेले साहित्य परत करणे तसेच मिळकत हस्तांतरित करु नये यासाठी प्रतिबंधात्मक आदेश करण्यात यावा तसेच राहणेची व्यवस्था म्हणून भाडेपोटी र.रु.५,०००/- इत्यादी जाबदार क्र.१ कडून मिळण्यासाठी आदेश व्हावेत यासाठी केला आहे.

२. अर्जातील कथनानुसार अर्जदार व जाबदार यांचा विवाह दि.२५.११.२०२३ रोजी हिंदू धर्मशास्त्रानुसार इचलकरंजी येथे संपन्न झाला. सदर विवाहाच्या याद्यांप्रमाणे विवाहाचा खर्च दोघे मिळून करण्याचे ठरले होते. मात्र जाबदार क्र.२ व ३ यांनी अर्जदारचे वडीलांकडे दहा तोळे सोने व संपूर्ण संसार सेटची मागणी केली होती. तसेच विवाहाकरीता अर्जदारचे वडीलांनी र.रु.१,५०,०००/- व इतर खर्चासाठी र.रु.५०,०००/- वेगळे दिले. तसेच लग्नामध्ये अर्जदारांना एकूण ६ तोळ्याचे सोने घातले होते. अर्जदार ही बोबडे बोलत असल्याबाबत लग्न ठरवतानाच जाबदारांना कल्पना दिली होती. जाबदार क्र.१ ने विवाहापूर्वी दिलेल्या बायोडेटानुसार जाबदार क्र.१ चे वार्षिक उत्पन्न ९,००,०००/- असून त्याचे स्वतःचे घर व ऑफिस असल्याबाबत नमूद केले होते. जाबदार क्र.१ चे शितल कुंभार नावाच्या बाईसोबत संबंध असल्याचे अर्जदारास विवाहानंतर समजून आले. अर्जदार ही जाबदार क्र.१ ते ३ यांच्यासह फ्लॅटमध्ये एकत्र राहत असताना जाबदार क्र.२ हा बेडरुममध्ये एकटा झोपत असे व अर्जदार व जाबदार क्र.१ व ३ हे हॉलमध्ये झोपत असत.

ONKAR SANJAY SHASTRI
Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2025.10.10 17:12:37 +0530

३. जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदारास "तू माहेरहून काही आणले नाहीस."असे म्हणून हिणवत असत. तसेच "तू जाड आहेस, बोबडी आहेस." असे टोमणे मारत. तसेच विवाहावेळी कमी सोने दिल्याबद्दलदेखील हिणवत असत. विवाहानंतरही जाबदार क्र.१ ने अर्जदारशी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले नाहीत व तो शितल कुंभार नावाच्या महिलेसोबत वारंवार फोनवर बोलत असे. मात्र त्याबाबतीत विचारणा केल्यास जाबदार क्र.१ व ३ हे अर्जदाराच्या अंगावर धावून येत असत. तसेच जाबदार क्र.२ हा अर्जदार हिचेकडे अत्यंत घृणास्पद नजरेने पाहून अश्लिल हावभाव व खाणाखुणा करत असे. तसेच जाबदार क्र.१ हा तिला मारहाणीची धमकी देत असे. तसेच अर्जदारास आई नसल्याबाबत तिला सतत हिणवत असे. तसेच जाबदार क्र.२ हा रात्रीच्या वेळी अर्जदारकडे पाहत हस्तमैथून करत असे.

४. तरीदेखील अर्जदार ही तिच्या माहेरच्या परिस्थितीमुळे व जाबदार क्र.१ च्या वागण्यात कधीतरी बदल होईल या आशेने दिवस काढत होती. जानेवारी २०२४ मध्ये माहेरी आल्यानंतर तिने हा प्रकार भावाला सांगितला. तिच्या भावाने त्यानंतर जाबदार क्र.२ ला फोन केला असता जाबदार क्र.२ ने त्याचा फोनवर अपमान केला. त्यानंतर अर्जदारने जाबदारांना अनेकवेळा नांदवण्यास घेऊन जाण्यासाठी फोन केले. मात्र जाबदार क्र.१ ने त्यास काही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अर्जदारचे भाऊ, वडील, काका इ. दि.०१.०२.२०२४ रोजी जाबदारचे घरी गेले व त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र जाबदार क्र.१ ने अर्जदारास नांदवण्यास नकार दिल्याने अर्जदार ही नाईलाजाने तिचे कपडे घेऊन माहेरी आली. मात्र जाबदार क्र.३ ने अर्जदारकडून तिचे सर्व दागिणे पूर्वीच काढून घेतलेले होते. ते सध्याही त्यांच्याकडेच आहेत. सदरप्रमाणे जाबदार क्र.१ ने अर्जदारशी कधीही शारिरीक संबंध प्रस्थापित केलेले नाहीत. तसेच लग्नापूर्वी ठरलेप्रमाणे लग्नाचा निम्मा खर्चही जाबदारांनी अर्जदारच्या वडीलांना दिलेला नाही. जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांना तिच्या गरजेच्या वस्तूदेखील दिलेल्या नाहीत. म्हणून अर्जदार हिचा मानसिक, शारिरीक, आर्थिक, लैंगिक छळ केलेला आहे. अर्जदारांनी वकीलांमार्फत दि.२६.०२.२०२४ रोजी कायदेशीर नोटीस पाठवली. मात्र त्यासदेखील जाबदार क्र.१ याने खोट्या आशयाचे उत्तर पाठवले आहे. अर्जदार हिस उत्पन्नाचा कोणताही आर्थिक स्त्रोत नाही. त्यामुळे अर्जदार हिस अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागत

आहे. जाबदार क्र.१ चे वार्षिक उत्पन्न लग्नावेळी ९ लाख रुपये होते. ते आता १५ लाख रुपये झालेले आहे. जाबदार यांचे कोल्हापूर येथे दोन फ्लॅट व वरळी, मुंबई येथे एक प्लॉट व कंदलगाव येथे १० एकर जमीन आहे. त्यामुळे अर्जदारास मुळ अर्जाचा निर्णय होईपर्यंत जाबदारांनी उदरनिर्वाहाकरीता प्रतिमहिना अनुक्रमे र.रु.२०,०००/- पोटगी देणेबाबत आदेश करण्यात यावा. तसेच अर्जदाराचे बाजूने संरक्षणात्मक आदेश, अर्जदाराचे स्त्रिधन जाबदारांनी परत करण्याबाबत आदेश, जाबदारांनी त्यांच्या मिळकती हस्तांतरित करु नयेत म्हणून प्रतिबंधात्मक आदेश व जाबदारांकडून राहणेची व्यवस्था म्हणून घरभाडेपोटी र.रु.५,०००/- देणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**५.** जाबदारांनी नि.१७ कडे आपले म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार व जाबदार क्र.१ च्या विवाहाची बाब मान्य केलेली आहे. परंतु अर्जातील इतर सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. जाबदारांच्या म्हणण्यानुसार त्यांनी अर्जदाराकडे कधीही कोणत्याही दागिन्यांची वा वस्तूची मागणी केली नव्हती. तसेच अर्जदार या बोबड्या बोलतात याबद्दल त्यांची कोणतीही अडचण नव्हती, तसेच जाबदार क्र.१ ने स्वतःचा बायोडेटा कधीही तयार केलेला नव्हता. तसेच विवाहाचा निम्मा खर्च जाबदारांनी विवाहावेळीच दिलेला होता, तसेच सर्व अनुषंगिक खर्च हा उभय पक्षांनी करणेचा होता. मात्र अर्जदारांनी तसा कोणताही खर्च केलेला नाही. जाबदार क्र.२ व ३ यांच्या आजारपणाबद्दल अर्जदारांना विवाह ठरवतेवेळीच कल्पना दिली होती. मात्र अर्जदार या मनमर्जीप्रमाणे एककल्ली स्वभावाप्रमाणे स्वतःस आवडेल त्या पध्दतीने वर्तन करीत होत्या. केवळ जाबदारांवरील रागामुळे व चिथावणीपोटी अर्जदारांनी जाबदारांवर खोट्या स्वरुपाचे गंभीर असे आरोप केलेले आहेत, असेही जाबदारांनी कथन केले आहे. तसेच जाबदारांसोबत प्रामाणिकपणे नांदणेची व जाबदारांच्या परिस्थितीचा स्विकार करण्याची इच्छा नव्हती. अर्जदार यांचा स्वभाव हट्टखोर, अहंकारी, लोभी व तापट आहे. तसेच त्यांच्या स्वतंत्र राहण्याच्या मागणीमुळे जाबदारांना प्रचंड मानसिक त्रास झालेला आहे, असेही जाबदारांचे म्हणणे आहे. अर्जदार ही स्वतः वैवाहिक शारिरीक संबंध ठेवणेस सक्षम नाही, ही बाब अर्जदाराने जाबदारांपासून लपवून ठेवून त्यांच्याविरुध्द खोटारडे व बिनबुडाचे आरोप केले आहेत. त्यामुळे अर्जदार या कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय जाबदारांचा त्याग करुन एका

ONKAR SANJAY SHASTRI
Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2025.10.10 17:12:56 +0530

वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वेगळ्या राहत आहेत. अर्जदारने जाबदारांचा सतत अपमान व अवहेलना करुन त्यांचा नाहक मानसिक छळ केलेला आहे. अर्जदारने जाबदारांसोबत एकत्र व्यवस्थित नांदावे यासाठी जाबदारांनी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींच्या मार्फत अनेक प्रयत्न केले आहेत. परंतु अर्जदारांनी त्यास दाद दिलेली नाही. अर्जदार या रितसर उत्पन्न कमवत होत्या व आहेत. तसेच त्यांची उत्पन्न कमविणेची क्षमता उत्तम आहे. त्यामुळे अर्जदारांना कोणत्याही प्रकारे अंतरिम पोटगीची आवश्यकता नाही. तसेच तिच्या संपत्ती व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रातील मजकूर हा खोटा, चुकीचा व लबाडीचा आहे. त्यामुळे जाबदारांनी अर्जदाराचा सदर अर्ज खर्चासहीत फेटाळणेत यावा, तसेच अर्जदार व तिच्या घरच्यांनी जाबदारांस कोणत्याही प्रकारे त्रास अगर धमक्या देऊ नयेत यासाठी समज देण्याची देखील विनंती केली आहे.

## कारणमिमांसा

६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारने आपल्या वादपत्रातील कथनांपृष्ठ्यर्थ नि.३/१ कडे अर्जदार व जाबदार क्र.१ च्या विवाहाच्या याद्या, नि.३/२ कडे जाबदार क्र.१ च्या बायोडेटाची छायांकीत प्रत, नि.३/३ कडे अर्जदार व जाबदार क्र.१ च्या विवाहाची पत्रिका आणि नि.३/४ कडे त्यांचा विवाह प्रसंगीचा फोटो, नि.३/५ कडे जाबदार क्र.१ च्या व्हीजीटींग कार्डची प्रत, तसेच नि.३/६ कडे अर्जदार यांनी जाबदार क्र.१ यांना पाठवलेल्या नोटीसीची पावती व पोचपावती, नि.३/७ कडे अर्जदारांनी जाबदारांना पाठवलेल्या नोटीसची प्रत, नि.३/८ कडे अर्जदार यांचे ओळखपत्र इ. कागदपत्रे दाखल केली आहेत. तर जाबदारांनी नि.२० कडे अनुक्रमे आपले सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ चे आयकर विवरणपत्र, नि.२०/४ ते २०/७ कडे जाबदार क्र.२ च्या उपचाराचे वैद्यकीय अहवाल, नि.२०/८ कडे जाबदार क्र.२ यांच्यावरील वैद्यकीय उपचाराबाबतची केस शीट, नि.२०/९ ते २०/११ कडे जाबदार क्र.२ यांची रुग्णालयातील डिस्चार्ज समरी व त्यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेचे अहवाल सादर केलेले आहेत. सदर सर्व कागदपत्रांचे औपचारिक पुरावा मुल्य हे पुराव्यानंतर निश्चित केले जाईल. परंतु अंतरिम पोटगीच्या अर्जासाठी सदर कागदपत्रे प्राथमिकदृष्टया विचारात घेता येईल.

७. सदर कागदपत्रांव्यतिरिक्त उभय पक्षांनी आपापले संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र नि.५ व १८ कडे सादर केलेले आहे. अर्जदाराच्या शपथपत्राचे अवलोकन करता इतर कोणत्याही न्यायालयात उभयपक्षांमध्ये कोणतेही न्यायालयीन प्रकरण चालू नसल्याचे दिसते. तसेच त्यातून अर्जदार ही कोणतेही काम करत नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे अर्जदाराकडे कोणतीही मालमत्ता अगर उत्पन्नाचे साधन नाही असे दिसून येते. त्याचवेळी जाबदार क्र.१ ची शैक्षणिक पात्रता ही उभयपक्षांच्या संपत्ती व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रांवरुन एम.बी.ए. एम.एस.डब्ल्यू. (MBA MSW) अशी दिसून येते. तसेच त्याचे मासिक उत्पन्न हे दरमहा र.रु.१२,०००/- ते रु.१५,०००/- इतके जाबदारांनी आपल्या शपथपत्रात दाखविले आहे. परंतु जाबदार क्र.१ ने आपले मागील तीन वर्षांचे आयकर विवरणपत्र नि.२०/४ ते २०/७ कडे दाखल केले आहे. त्यांचे अवलोकन केल्यास जाबदार क्र.१ याचे निश्चित मासिक उत्पन्न किती हे जरी प्राथमिकदृष्टया स्पष्ट होत नसले तरी जाबदार क्र.१ हा कमावता व्यक्ती असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर अर्जदारने जाबदारांवर केलेले आरोपदेखील गंभीर स्वरुपाचे आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाला किंवा नाही यावर सुस्पष्ट कथन याक्षणी करता येत नसले तरी जाबदार क्र.१ ने अर्जदारासोबतचे नातेसंबंध वादपत्रामध्ये नाकारलेले नाहीत. तसेच काही काळापुरते का होईना, उभयपक्षांमध्ये म.सं.कौ.हिं. कायद्याच्या कलम २(फ) व २(स) ला अभिप्रेत असणारे "कौटूंबिक नातेसंबंध" (Domestic Relationship) व सामाईक सहजीवन (Shared household) आहे असे दिसते. अशावेळी अर्जदार ही कौटूंबिक हिंसाचारग्रस्त महिला आहे किंवा कसे हे विस्तृत पुराव्याव्दारे ठरवता येत असले तरी जाबदार क्र.१ चे आपल्या पत्नीबाबत (म्हणजेच अर्जदाराबाबत) असलेल्या नैतिक कर्तव्याचा (Moral Duty) विसर पाडता येणार नाही. त्या कारणास्तव अर्जदार ही जाबदार क्र.१ कडून काही रक्कम अंतरिम पोटगीपोटी मिळण्यास हक्कदार वाटते. उभयपक्षांची वादपत्रे व त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे तसेच जाबदार क्र.१ ने इतर जाबदारांच्या वैद्यकीय उपचारापोटी दाखल केलेली कागदपत्रे पाहता जाबदार क्र.१ च्या निश्चित उत्पन्नाबाबत सद्यस्थितीत काही अंदाज बांधत येत नसला तरी जाबदार क्र.१ कडे उत्पन्नाची क्षमता (Earning Capacity) आहे, असेच नमूद करावे लागेल. परंतु त्याचवेळी सदरकामात संरक्षण अधिकाऱ्यांचा संरक्षण अहवाल अभिलेखावर दाखल झालेला नाही. त्यामुळे अर्जदारास दरमहा अंतरिम पोटगी देणेबाबत आदेश करणेपेक्षा

ONKAR SANJAY SHASTRI
Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2025.10.10 17:13:03 +0530

एकरकमी अंतरिम पोटगी देणेचा आदेश केल्यास सदरचे प्रकरण लवकरात लवकर निकाली काढणेस देखील मदत होईल असे वाटते. परंतु त्याचवेळी अर्जदारने मागितलेले संरक्षणात्मक आदेश, प्रतिबंधात्मक आदेश व स्त्रीधन परतीचा आदेश याबाबत कोणतीही अपवादात्मक असामान्य परिस्थिती अभिलेखावर दिसून येत नाही, की ज्यामुळे न्यायालयास त्याच्या विवेकाधीन (Discretionary) बाबींवर आदेश करणे भाग पडेल. त्यामुळे सदरकामात उभयपक्षांची वादपत्रे, कागदपत्रे व अभिलेखातील एकूण परिस्थिती पाहता अर्जदारास जाबदार क्र.१ ने एकरकमी अंतरिम पोटगीपोटी र.रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) देणेचे आदेश करणे योग्य ठरेल. सबब, अर्जदाराचा अर्ज मी अंशतः मंजूर करुन पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्जदारचा सदर अर्ज (निशाणी ११) अंशतः मंजूर करणेत येतो.

२. जाबदार क्र.१ ने अर्जदारास अंतरिम भरपाईपोटी र.रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) दयावेत.

३. सदर आदेशाची प्रत उभयपक्षांना विनामूल्य देण्यात यावी.

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.10.10 17:13:11 +0530

**सांगली** **(ओंकार सं. शास्त्री)**
**दिनांक १०.१०.२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली**